**<u>*प्रेस नोट*</u>**

# 'पीएमआरडीए'चे आता स्वतंत्र अतिक्रमण निर्मूलन पथक;

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो धावण्यास सज्ज!

**– महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांची माहिती; चाकणमधील वाहतूक कोंडी सोडविणे, परवडणारी घरे आणि नदी सुधार प्रकल्पांना गती!**

पुणे : हिंजवडी ते शिवाजीनगर या बहुचर्चित मेट्रो मार्गिकेचे (लाईन-३) काम अंतिम टप्प्यात आले असून, तांत्रिक पूर्तता झाल्यानंतर येत्या १० ते १२ दिवसांत ही मेट्रो प्रवाशांच्या सेवेत दाखल होण्यासाठी सज्ज आहे. यासोबतच शहरातील अनधिकृत होर्डिंग्ज आणि अतिक्रमणांवर कठोर कारवाई करण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) लवकरच स्वतंत्र 'अतिक्रमण निर्मूलन पथक' स्थापन केले जाणार आहे, अशी माहिती 'पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी मंगळवारी (दि. २९) दिली.

'पीएमआरडीए'च्या मुख्यालयात आयोजित पत्रकार संवाद कार्यक्रमात डॉ. चौधरी आणि अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी यांनी 'पीएमआरडीए'च्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांबाबत सविस्तर माहिती दिली.

डॉ. अभिजीत चौधरी म्हणाले की, माण-हिंजवडी ते शिवाजीनगर या २३ किलोमीटर लांबीच्या आणि २३ स्थानकांचा समावेश असलेल्या मेट्रो मार्गिकेतील संपूर्ण २३ किलोमीटर लांबीच्या मार्गिकेला, व १७ स्थानकांना 'सीएमआरएस'ची मंजुरी मिळालेली आहे. 'सीएमआरएस'ने सुचविलेल्या काही तांत्रिक बाबींची पूर्तता येत्या १० ते १२ दिवसांत पूर्ण केली जाईल. त्यानंतर १७ स्थानकांसह संपूर्ण मार्गिकेवर तातडीने मेट्रो सेवा सुरू करण्याची प्रशासनाची तयारी असून, या सेवेच्या उद्घाटनाचा अंतिम निर्णय वरिष्ठ पातळीवर घेतला जाईल. तसेच, हिंजवडीतील मेट्रो प्रवाशांना 'लास्ट माईल कनेक्टिव्हिटी' उपलब्ध होण्यासाठी अंदाजे ४२६ कोटी रुपयांचा प्रकल्प हाती घेण्यात आला असून, याचा ५० टक्के खर्च पीएमआरडीए व ५० टक्के खर्च एमआयडीसी उचलणार आहे.

पुणे महानगर प्रदेशाचे विद्रूपीकरण रोखण्यासाठी 'पीएमआरडीए'ने मोहीम उघडली असून, जानेवारी २०२६ पासून आतापर्यंत १५३ अनधिकृत होर्डिंग्ज आणि ९१९ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत. विकास आराखड्यातील आरक्षित जागा आणि रस्त्यांवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी आता अद्ययावत यंत्रसामग्री आणि मनुष्यबळासह 'अतिक्रमण निर्मूलन पथक' स्थापन करण्यात येईल.

याशिवाय, मोशी येथील सेक्टर ११ आणि सेक्टर १२ मधील अनधिकृत पार्किंगला आळा घालण्यासाठी लवकरच अधिकृत 'सशुल्क पार्किंग' व्यवस्था उभारण्यात येणार आहे.

चाकण परिसरातील वाढती वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी 'चाकण डी-क्लॉगिंग'अंतर्गत सात रस्त्यांची कामे वेगाने सुरू असून, उर्वरित चार रस्त्यांचे भूसंपादन प्रगतीपथावर आहे. येत्या नोव्हेंबर-डिसेंबरपर्यंत ही सात रस्त्यांची कामे पूर्ण होऊन चाकणकरांना दिलासा मिळेल. वेस्टर्न बायपास आणि म्हाळुंगे परिसरातील रस्त्यांच्या भूसंपादनाचे प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आले आहेत.

सर्वसामान्यांसाठी मोशी येथील सेक्टर १२ मध्ये उभारण्यात येत असलेल्या सुमारे साडेसहा हजार घरांचे बांधकाम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करून सोडत काढण्याचे उद्दिष्ट आहे. भविष्यातील 'ग्रोथ हब'च्या आसपास पंतप्रधान आवास योजना (पीएमएवाय २) या केंद्र सरकारच्या योजनेतून प्रत्येक तालुक्यात किमान एक 'परवडणाऱ्या घरांचा प्रकल्प' उभारण्याचा 'पीएमआरडीए'चा मानस आहे.

इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पांतर्गत ९५, तर पवना नदी सुधार प्रकल्पांतर्गत १५ नाले 'इंटरसेप्ट' करून सांडपाण्यावर एसटीपी प्रकल्पांमार्फत प्रक्रिया केली जाईल, व त्यानंतरच पाणी नदीत सोडले जाईल. इंद्रायणी व पवना नदी सुधार प्रकल्पांची निविदा सध्या तांत्रिक मूल्यांकनाच्या स्तरावर असून, आचारसंहितेनंतर वर्क ऑर्डर दिली जाईल.

दरम्यान, पीएमआरडीएचे कामकाज अधिक पारदर्शक व गतीमान करण्यासाठी विविध परवानगी प्रक्रिया 'ऑनलाइन' केली असून, ई-गव्हर्नन्सचा प्रशासनात वापर केला जात असल्याचेही महानगर आयुक्तांनी स्पष्ट केले.

---

**पुरुषोत्तम सांगळे**

माहिती व जनसंपर्क अधिकारी, पीएमआरडीए, पुणे